॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२६-२७/९७ दिनांकः- २५/०९/२०२६

<u>अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे</u>

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ, लातूर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
मा. समन्वयक कै. उत्तमराव राठोड आदीवासी विकास व संशोधन केंद्र किनवट.

विषय : ज्ञानतीर्थ– २०२६ **आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव माहिती व सादरीकरण नियमावली पुस्तिकेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ च्या ज्ञानतीर्थ– २०२६ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवासंदर्भात **माहिती व सादरीकरण नियमावली पुस्तिका** सदरील पत्रासोबत जोडण्यात आली आहे. तरी सदरील पुस्तिकेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, ही विनंती.


डॉ. राजपालसिंह चिखलीकर
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत महितीस्तव :

सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding Information and Presentation Manual for Youth Festival या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration व Student's Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## विद्यार्थी विकास विभाग



### आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव

## माहिती व सादरीकरण नियमावली पुस्तिका

# आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव

युवक महोत्सवाचा प्रारंभ मा. कुलगुरू/प्र. कुलगुरू/युवक महोत्सवाचे उद्घाटक व पाहुणे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ध्वजारोहणाने व्हावा. तसेच सहभागी महाविद्यालयांनीही आपले नामफलक आणावेत. या प्रसंगी सर्व स्पर्धकांनी पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी.

## प्रतिज्ञा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील आम्ही सर्व विद्यार्थी—विद्यार्थिनी, या युवक महोत्सवामध्ये भारतीय कलांचा वारसा घेऊन स्वतःच्या सुप्त कला—गुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य व सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगून हा युवक महोत्सव आनंदमय करू. आमच्या उदात्त सांस्कृतिक परंपरेला साक्षी ठेवून, बुध्दिनिष्ठ आणि विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटिबध्द होणे, हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. या युवक महोत्सवातून आमच्यातील सुप्त कला—गुणांचा विकास होण्यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णतः शांततामय आणि आनंदी वातावरणात पूर्ण करण्याची आम्ही प्रतिज्ञा घेत आहोत.

## युवक महोत्सव स्थानिक संयोजन समिती

युवक महोत्सवाचे यशस्वी संयोजन व संचालन होण्याकरिता एक स्थानिक संयोजन समिती खालीलप्रमाणे नियुक्त केली जाईल.

१. संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य — अध्यक्ष

२. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाशी संबंधित असणारा एक प्राध्यापक संयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून नियुक्त केला जाईल. आणि तो या समितीचा सचिव असेल.

३. पाच प्राध्यापक (संयोजक प्राचार्यांकडून नियुक्त दोन महिला व तीन पुरुष) — सदस्य

(साधारणतः शारीरिक शिक्षण, एन.सी.सी., एन.एस.एस. विभागातील संबंधित प्राध्यापकांमधून एकाची नियुक्ती संयोजक प्राचार्य करतील.)

४. एक प्राध्यापक — सदस्य

(सांस्कृतिक विभाग/स्थानिक कर्मचारी कल्याण समितीचा प्रतिनिधी)

५. संयोजक महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेचे प्रतिनिधी — सदस्य

## संयोजन समितीच्या कामाचे स्वरूप:

१. सहभागी व परीक्षकांच्या निवासाची व्यवस्था करणे.

२. स्पर्धेसाठी पाच मंचांची व्यवस्था करणे, आवश्यक सभागृह तयार करून घेणे, भाडे ठरविणे, बैठक व्यवस्था करणे.

३. आवश्यक स्पर्धा साहित्याची खरेदी करणे.

४. निमंत्रण पत्रिका तयार करणे.

५. महत्त्वाच्या व्यक्तींना कायक्रमांची निमंत्रणे देणे.

६. अडचणींच्या प्रसंगी आवश्यक वाटल्यास स्पर्धा केंद्र बदलणे.

७. विविध कलेच्या स्पर्धा एकत्र घेणे शक्य नसल्यास पर्यायी ठिकाणी ह्या स्पर्धा विभागून घेणे आणि त्यांचे नियंत्रण करणे.

८. स्पर्धा सुरू होण्यापूर्वीची आयोजनासंदर्भातील कामे, स्पर्धा सुरू असतानाची आयोजनासंदर्भातील कामे, स्पर्धा संपल्यानंतरची आयोजनासदंर्भातील कामे करणे.

९. आवश्यक ती पदके तसेच स्मृतिचिन्हे तयार करून घेणे.

१०. स्पर्धेच्या ठिकाणी वादाचे प्रसंग होवू नयेत म्हणून प्रयत्न करणे.

## तक्रार निवारण समिती

* युवक महोत्सवामध्ये उपस्थित झालेले/केलेले विविध मुद्दे, हरकती इत्यादींवर विचार करून निर्णय देण्याचे अधिकार संचालक, विद्यार्थी विकास विभाग, आयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी विकास विभाग सल्लागार समितीकडे असतील.

* परीक्षकांनी दिलेला निकाल अंतिम असेल. जर निकालाच्या बाबतीत कोणी तक्रार केलीच तर तक्रार निवारण समितीने (सल्लागार समिती) दिलेला निर्णय अंतिम राहील.

* तक्रार निवारण समिती अध्यक्ष संचालक विद्यार्थी विकास विभाग, सदस्य – संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी विकास विभाग युवक महोत्सव सल्लागार समिती.

# युवक महोत्सवातील स्पर्धा

## अ. संगीत विभाग **(Music)**

१. शास्त्रीय गायन (Classical Vocal Solo)
२. शास्त्रीय तालवाद्य (Classical Instrument Solo Percussion)
३. शास्त्रीय सूरवाद्य (Classical Instrument Solo Non-Percussion)
४. सुगम गायन (भारतीय) (Light Vocal - Indian)
५. सुगम गायन (पाश्चात्त्य) (Light Vocal - Western)
६. समूह गायन (भारतीय) (Group Song - Indian)
७. समूह गायन ( पाश्चात्त्य) (Group Song - Western)
८. कव्वाली (Qawwali)

## ब. नृत्य विभाग **(Dance)**

९. लोकनृत्य/आदिवासी नृत्य (Folk Dance / Tribal Dance)
१०. शास्त्रीय नृत्य (Classical Dance)

## क. नाट्य विभाग **(Theatre)**

११. एकांकिका – मराठी, हिंदी (One Act Play)
१२. विडंबन (उपरोधिक अभिनय) (Skit)
१३. मूक अभिनय (Mime)
१४. नक्कल (Mimicry)

## ड. वाङ्मय विभाग

१५. वादविवाद (मराठी/हिन्दी/इंग्रजी) (Debate)
१६. वक्तृत्त्व (मराठी/हिन्दी/इंग्रजी) (Elocution)
१७. कथाकथन (मराठी/हिन्दी) (Story Narration )

## इ. ललित कला विभाग

१८. चित्रकला (on the spot painting)
१९. कोलाज (Collage)
२०. पोस्टर मेकिंग (Poster Making)
२१. मृद्‌मूर्तिकला (Clay Modeling)
२२. व्यंगचित्रकला (Cartooning)
२३. रांगोळी (Rangoli)
२४. स्थळ छायाचित्रण (Spot Photography)
२५. कलात्मक जुळवणी (Installation)
२६. मेहेंदी (Mehandi )

## फ. महाराष्ट्राच्या लोककला

२७. पोवाडा
२८. लावणी
२९. लोकसंगीत (Folk Orchestra)
३०. प्रबोधनात्मक जलसा (सत्यशोधकी/आंबेडकरी)

## आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवातील स्पर्धा

## संख्या, साथीदार, वेळ माहिती तक्ता

| अ. क्र. | स्पर्धा | स्पर्धक संख्या | साथीदार संख्या | स्पर्धक + साथीदार | स्पर्धेचा वेळ | स्पर्धेचा लाभांश वेळ (Grace Time) |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. | संगीत विभाग | | | | | |
| | १. शास्त्रीय गायन | १ | २ | ३ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | २. शास्त्रीय तालवाद्य | १ | २ | ३ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | ३. शास्त्रीय सूरवाद्य | १ | २ | ३ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | ४. सुगम गायन (भारतीय) | १ | २ | ३ | ४ ते ६ मि. | १५ सेकंद |
| | ५. सुगम गायन (पाश्चात्त्य) | १ | २ | ३ | ४ ते ६ मि. | १५ सेकंद |
| | ६. समूह गायन (भारतीय) | ६ | ३ | ९ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | ७. समूह गायन (पाश्चात्त्य) | ६ | ३ | ९ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | ८. कव्वाली | ६ | ३ | ९ | ६ ते ८ मि. | १५ सेकंद |
| ब. | नृत्य विभाग | | | | | |
| | ९. लोकनृत्य/आदिवासी नृत्य | ८ ते १० | ५ | १५ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | १०. शास्त्रीय नृत्य | १ | ३ | ४ | १२ ते १५मि. | ३० सेकंद |
| क. | नाटय विभाग | | | | | |
| | ११. एकांकिका (मराठी/हिंदी ) | ९ | ३ | १२ | २५ ते ३०मि. | ३० सेकंद |
| | १२. उपरोधिक/विडंबन अभिनय | ६ | ३ | ९ | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | १३. मूक अभिनय | ६ | २ | ८ | ४ ते ५ मि. | १५ सेकंद |
| | १४. नक्कल | १ | — | १ | ४ ते ५ मि. | १५ सेकंद |
| ड. | वाङ्मय विभाग | | | | | |
| | १५. वादविवाद (मराठी/हिंदी/इंग्रजी) | २ | — | २ | ५ ते ७ मि. | १५ सेकंद |
| | १६. वक्तृत्व (मराठी/हिंदी/इंग्रजी) | १ | — | १ | ५ ते ७ मि. | १५ सेकंद |
| | १७. कथाकथन (मराठी/हिंदी) | १ | — | १ | ५ ते ७ मि. | १५ सेकंद |
| इ. | ललित कला विभाग | | | | | |
| | १८. चित्रकला | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | १९. कोलाज | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २०. पोस्टर मेकिंग | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २१. मृद्‌मूर्तिकला | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २२. व्यंग्यचित्रकला | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २३. रांगोळी | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २४. स्थळ छायाचित्रण | १ | — | १ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २५. मेहेंदी | १ | १ | २ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| | २६. इन्स्टॉलेशन | ४ | — | ४ | २ तास ३० मि. | ३० सेकंद |
| फ. | महाराष्ट्राच्या लोककला विभाग | | | | | |
| | २७. पोवाडा | ३ ते ६ | ३ | —— | ८ ते १० मि. | ३० सेकंद |
| | २८. लावणी | १ ते ६ | ५ | —— | ६ ते ८ मि. | ३० सेकंद |
| | २९. लोकसंगीत( Folk Orchestra) | ९ | ३ | १२ | ७ ते १० मि. | ३० सेकंद |
| | ३०. प्रबोधनात्मक जलसा | ६ | ३ | ९ | १५ मि. | ३० सेकंद |

## गुणविभागणी तक्ता

### अ. संगीत विभाग (Music)

#### स्पर्धा क्र. : १ शास्त्रीय गायन

| | | |
|---|---|---|
| १. | रागाची निवड | — १० गुण |
| २. | निर्दोष आलाप | — १० गुण |
| ३. | आवाजाची तयारी | — १० गुण |
| ४. | तालाची तयारी | — १० गुण |
| ५. | स्वरबंधाचे नावीन्य व विविधता | — १० गुण |
| ६. | सादरीकरण | — १० गुण |
| | **एकूण** | **— ६० गुण** |

#### स्पर्धा क्र. २ : शास्त्रीय तालवाद्य

| | | |
|---|---|---|
| १. | रागाची व तालाची निवड | — १० गुण |
| २. | निर्दोषता | — १० गुण |
| ३. | वादनातील नैपुण्य | — १० गुण |
| ४. | वादनातील नावीन्य व विविधता | — १० गुण |
| | **एकूण** | **— ४० गुण** |

#### स्पर्धा क्र. ३ : शास्त्रीय सूरवाद्य

| | | |
|---|---|---|
| १. | रागाची व तालाची निवड | — १० गुण |
| २. | निर्दोषता | — १० गुण |
| ३. | वादनातील नैपुण्य | — १० गुण |
| ४. | वादनातील नावीन्य व विविधता | — १० गुण |
| | **एकूण** | **— ४० गुण** |

#### स्पर्धा क्र. ४ : सुगम गायन (भारतीय)

| | | |
|---|---|---|
| १. | गीताची निवड | — १० गुण |
| २. | स्वररचनेचे नावीन्य | — १० गुण |
| ३. | निर्दोष स्वरबंध व आवाजातील माधुर्य | — १० गुण |
| ४. | सादरीकरण | — १० गुण |
| ५. | ताल | — १० गुण |
| | **एकूण** | **— ५० गुण** |

## स्पर्धा क्र. ५ : सुगम गायन (पाश्चात्त्य)

| | | |
|---|---|---|
| १. | गीताची निवड | — १० गुण |
| २. | स्वररचनेचे नावीन्य | — १० गुण |
| ३. | निर्दोष स्वरबंध व आवाजातील माधुर्य | — १० गुण |
| ४. | सादरीकरण | — १० गुण |
| ५. | ताल | — १० गुण |
| | **एकूण** | **— ५० गुण** |

## स्पर्धा क्र. ६ : समूह गायन (भारतीय)

| | | |
|---|---|---|
| १. | गीताची निवड | — १० गुण |
| २. | स्वररचनेचे नावीन्य | — १० गुण |
| ३. | ताल | — १० गुण |
| ४. | गती | — १० गुण |
| ५. | सांघिक एकता | — १० गुण |
| ६. | सादरीकरण | — १० गुण |
| | **एकूण** | **— ६० गुण** |

## स्पर्धा क्र. ७ : समूह गायन (पाश्चात्त्य)

| | | |
|---|---|---|
| १. | गीताची निवड | — १० गुण |
| २. | स्वररचनेचे नावीन्य | — १० गुण |
| ३. | ताल | — १० गुण |
| ४. | गती | — १० गुण |
| ५. | सांघिक एकता | — १० गुण |
| ६. | सादरीकरण | — १० गुण |
| | **एकूण** | **— ६० गुण** |

## स्पर्धा क्र. ८ : कव्वाली

| | | |
|---|---|---|
| १. | कव्वालीची निवड | — १० गुण |
| २. | स्वररचनेचे नावीन्य | — १० गुण |
| ३. | वेशभूषा | — १० गुण |
| ४. | सांघिक एकता | — १० गुण |
| ५. | सादरीकरण | — १० गुण |
| | **एकूण** | **— ५० गुण** |

## ब. नृत्य विभाग (Dance)

### स्पर्धा क्र. ९ : लोकनृत्य/आदिवासी नृत्य

| | | |
|---|---|---|
| १. | पदन्यास व मुद्राभिनय | — १० गुण |
| २. | ज्या प्रांताचे व जमातीचे लोकनृत्य असेल त्यानुरूप वेशभूषा व तालवाद्य | — १० गुण |
| ३. | गती | — १० गुण |
| ४. | ताल | — १० गुण |
| ५. | सांघिक एकता | — १० गुण |
| ६. | सादरीकरण | — १० गुण |
| | **एकूण** | **— ६० गुण** |

### स्पर्धा क्र. १० : शास्त्रीय नृत्य

| | | |
|---|---|---|
| १. | तंत्र आणि ताल | — ३० गुण |
| २. | अभिनय | — ३० गुण |
| ३. | कालानुरूप निवड | — १० गुण |
| ४. | रंगभूषा, वेशभूषा | — १० गुण |
| ५. | पार्श्वसंगीत | — १० गुण |
| ६. | सादरीकरण | — १० गुण |
| ७. | तंत्र आणि शैली | — ३० गुण |
| ८. | भावाभिनय | — १० गुण |
| ९. | वेशभूषा कालानुरूप | — १० गुण |
| | **एकूण** | **— १५० गुण** |

## क. नाट्य विभाग (Theatre)

### स्पर्धा क्र. ११ : एकांकिका

| | | |
|---|---|---|
| अ) | अभिनय | — ४० गुण |
| ब) | निर्मिती | — ४० गुण |
| क) | संहितेची निवड | — १० गुण |
| ड) | एकंदर प्रतिसाद | — १० गुण |
| | **एकूण** | **— १०० गुण** |

अ) १. आवाज
२. भाषण
३. गती
४. भावनाविष्कार
४. देहबोली
५. सांघिक एकता

ब) १. पात्रयोजना
२. रंगमंच व्यापार
३. चित्रसंगती
४. उत्कर्षबिंदू साधण्याचे प्रयत्न
५. नाट्यार्थ्याची समज
६. सादरीकरण
७. रंगभूषा आणि वेशभूषा
८. नेपथ्य आणि प्रकाशयोजना

## स्पर्धा क्र. १२ : विडंबन (उपरोधिक अभिनय) (Skit)

| | | |
|---|---|---|
| १. | मध्यवर्ती कल्पना | — १० गुण |
| २. | अभिनय | — १० गुण |
| ३. | वेशभूषा व रंगभूषा | — १० गुण |
| ४. | परिणामकारकता | — १० गुण |
| | एकूण | — ४० गुण |

## स्पर्धा क्र. १३ : मूक अभिनय (Mime)

| | | |
|---|---|---|
| १. | मध्यवर्ती कल्पना | — १० गुण |
| २. | अभिनय | — १० गुण |
| ३. | वेशभूषा व रंगभूषा | — १० गुण |
| ४. | परिणामकारकता | — १० गुण |
| | एकूण | — ४० गुण |

## स्पर्धा क्र. १४ : नक्कल (Mimicry)

| | | |
|---|---|---|
| १. | मध्यवर्ती कल्पना | — १० गुण |
| २. | अभिनय | — १० गुण |
| ३. | आवाज | — १० गुण |
| ४. | परिणामकारकता | — १० गुण |
| | एकूण | — ४० गुण |

## ड. वाङ्मय विभाग **(Literature)**

## स्पर्धा क्र. १५ : वादविवाद (Debate)

| | | |
|---|---|---|
| १. | विषयज्ञान | — १० गुण |
| २. | सभाधीटपणा | — १० गुण |
| ३. | भाषाशैली | — १० गुण |
| ४. | मुद्यांचे खंडण | — १० गुण |
| ५. | प्रतिसाद | — १० गुण |
| | एकूण | — ५० गुण |

## स्पर्धा क्र. १६ : वक्तृत्त्व स्पर्धा (Elocution)

| | | |
|---|---|---|
| १. | विषयज्ञान | — १० गुण |
| २. | सभाधीटपणा | — १० गुण |
| ३. | भाषाशैली | — १० गुण |
| ४. | देहबोली | — १० गुण |
| ५. | प्रतिसाद | — १० गुण |
| | एकूण | — ५० गुण |

## स्पर्धा क्र. १७: कथाकथन (Story Narration )

१. विषयज्ञान — १० गुण
२. सभाधीटपणा — १० गुण
३. भाषाशैली — १० गुण
४. देहबोली — १० गुण
५. प्रतिसाद — १० गुण

एकूण — ५० गुण

## इ. ललित कला विभाग **(Fine Arts)**

### स्पर्धा क्र. १८,१९,२०,२१,२२,२३, : ललितकला स्पर्धा

(चित्रकला, कोलाज, पोस्टर मेकींग, मृदमूर्तिकला, व्यंग्यचित्रकला, रांगोळी, )

१. कल्पकता — १० गुण
२. रंगसंगती — १० गुण
३. मांडणी — १० गुण
४. सफाईदारपणा — १० गुण
५. एकूण प्रभाव — १० गुण

एकूण — ५० गुण

### स्पर्धा क्र. २४ : स्थळ छायाचित्रण (Spot Photography)

१. मांडणी/रचना — १० गुण
२. तांत्रिक दर्जा — १० गुण
३. विषय सुसंगतता/अनुरूपता — १० गुण
४. परिणामकारकता/प्रभाव — १० गुण

एकूण — ४० गुण

### स्पर्धा क्र. २५ : कलात्मक जुळवणी (Installation)

१. कल्पकता — १० गुण
२. जुळवणी — १० गुण
३. साधनसामग्री — १० गुण
४. उपयोगिता — १० गुण

एकूण — ४० गुण

### स्पर्धा क्र. २६ : मेहेंदी (Mehandi)

१. कल्पकता — १० गुण
२. मांडणी — १० गुण
३. सफाईदारपणा — १० गुण
४. एकूण प्रभाव — १० गुण

एकूण — ४० गुण

फ. महाराष्ट्राच्या लोककला विभाग

## स्पर्धा क्र. २७ व २८

महाराष्ट्र लोककलांच्या स्पर्धेकरिता खालीलप्रमाणे गुणविभागणी राहील

| स्पर्धा क्र. | स्पर्धा | सादरीकरण | गुणविभागणी | | परिणाम प्रभाव | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | संगीत | वेशभूषा व रंगभूषा | | |
| २७ | पोवाडा | १५ | १५ | १० | १० | ५० |
| २८ | लावणी | २० | १० | १० | १० | ५० |
| | | | | | | |

## स्पर्धा क्र. २९ लोकसंगीत (फोक ऑर्केस्ट्रा)

१. निवडलेली धून — १० गुण
२. वापरलेली वाद्ये — १० गुण
३. वेशभूषा — १० गुण
४. सादरीकरण — १० गुण
५. एकूण परिणाम — १० गुण

एकूण — ५० गुण

## स्पर्धा क्र. ३० : प्रबोधनात्मक जलसा

१. विषय — १० गुण
२. रंगभूषा व वेशभूषा — १० गुण
३. संगीत — १० गुण
४. सादरीकरण — १० गुण
५. परिणामकारकता — १० गुण

एकूण — ५० गुण

# सर्वसाधारण विजेतेपद निश्चितीबाबत गुणांकन

| अ.क्र. | विजेतेपद | गुणांकन |
|---|---|---|
| १. | प्रथम | १० (दहा) |
| २. | द्वितीय | ०७ (सात) |
| ३. | तृतीय | ०५ (पाच) |

उपरोक्त गुणदान तक्त्यास सल्लागार समितीची बैठक दि.०४/१०/२००७ नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात आली आहे.

टीप : १) सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या संघास सर्वसाधारण विजेतेपद व दुसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या संघास उपविजेतेपद घोषित करण्यात येईल.

२) सर्वसाधारण विजेतेपद व उपविजेतेपदासाठी गुणांकन करताना शोभायात्रा पारितोषिकांचे गुण ग्राह्य धरले जाणार नाहीत.

# विविध स्पर्धांचे नियम व अटी

विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयाचा आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात समाविष्ट असलेल्या स्पर्धाप्रकारांसाठी प्रत्येकी एकच संघ स्पर्धेत भाग घेऊ शकेल. तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व पदव्युत्तर विभागांचा मिळून प्रत्येक स्पर्धेसाठी एकच संघ स्पर्धेत भाग घेऊ शकेल.

**युवक महोत्सवातील विविध कलाप्रकारांचे/स्पर्धाप्रकारांचे सादरीकरण पूर्वनियोजित लॉट्सपध्दतीनुसार होईल.**

## सांघिक स्पर्धा

### १. एकांकिका

१ एकांकिका मराठी/हिन्दी भाषेत असावी. ह्या स्पर्धेकरिता प्रत्येक महाविद्यालयास वरीलपैकी कोणत्याही एका भाषेमध्ये प्रवेशिका पाठविता येईल.

२ सादरीकरणाच्या तयारीसाठी १० मिनिटे आणि प्रयोगासाठी २५ ते ३० मिनिटापेक्षा अधिक वेळ मिळणार नाही.

३ एकांकिकेत भाग घेणाऱ्यांची संख्या ९ पेक्षा जास्त नसावी. संघ संपूर्ण मुलांचा किंवा संमिश्र असला तरी चालेल, परंतु पुरुषाची भूमिका पुरुषांनीच व स्त्रियांची भूमिका स्त्रियांनीच करणे बंधनकारक आहे.

४ पश्चिम विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सवाच्या स्पर्धेसाठी निवड करताना हिन्दी एकांकिकेस प्राधान्य देण्यात येईल. (परंतु बंधनकारक नाही)

५ अ) दिग्दर्शक विद्यार्थ्यांपैकीच असणे आवश्यक आहे.

ब) रंगभूषाकार व पाार्श्वसंगीतकार यांना स्पर्धकांच्या संख्येत गणले जाणार नाही.

क) प्रकाशयोजना व सामान्यत: लागणारे फर्निचरसारखे साहित्य आयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल. परंतु काही विशिष्ट साहित्य लागत असल्यास त्याची व्यवस्था संघानेच करावी.

६ उत्कृष्ट अभिनय पुरुष व स्त्री पारितोषिके (वैयक्तिक) स्वतंत्रपणे निवडले जातील.

७ उत्कृष्ट दिग्दर्शन पारितोषिक (वैयक्तिक) दिले जाईल.

### २. लोकनृत्य/आदिवासी नृत्य

१. प्रत्येक महाविद्यालयास कमीत कमी ८ व अधिकाधिक १० स्पर्धकांचा संघ पाठविता येईल. संघ मुलांचा किंवा मुलींचा अथवा मुला–मुलींचा मिळून असू शकेल. संघाबरोबर वादक साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ५ असावी.

२. लोकनृत्यासंबंधीचे पार्श्वसंगीत अनुषंगिक व सुसंगत असणे आवश्यक आहे.

३. लोकनृत्यासंबंधीची पार्श्वभूमी, ते लोकनृत्य कोणत्या प्रदेशातील, कोणत्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. त्या नृत्याची वैशिष्ट्ये प्रतिपादित करणारे टिपण संचालक, विद्यार्थी विकास विभाग व संयोजन समितीकडे सादर करावे.

४. लोकनृत्य सादर करताना कोणत्याही प्रकारचे ध्वनिमुद्रित (टेपरेकॉर्डर, रेकॉर्डप्लेअर) साहित्य पार्श्वसंगीत म्हणून वापरता येणार नाही.

## ३. समूहगायन

१. संघ मुलांचा—मुलींचा अथवा मुलामुलींचा मिळूनही असू शकेल.

२. स्पर्धेतील संख्या, साथीदार, स्पर्धेची वेळ याविषयाची नियमावली माहिती तक्त्याप्रमाणे राहील.

## ४. कव्वाली

१. एक महाविद्यालयातून एकाच संघास भाग घेता येईल.

२. संघ मुलांचा, मुलींचा किंवा मुलामुलींचाही असा असेल.

३. कव्वाली हिन्दी,मराठी दोन्ही भाषेतून चालेल.

(भाषा हिन्दी, मराठी असली तरी स्पर्धा एकच समजली जाईल)

## ५. प्रबोधनात्मक जलसा

प्रबोधनात्मक जलशांचे स्वरूप व नियमावली :

### अ) सत्यशोधकी जलसा

महात्मा फुले यांच्या विचार आणि कार्याचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून संहिता निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान काळाची गरज म्हणून मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे संहिता लिखित असावी. सोबत महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

### ब) आंबेडकरी जलशांचे स्वरूप :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे व विचारांचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून संहिता निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान काळाची गरज म्हणून मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे संहिता लिखित असावी. सोबत महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

### जलशांचे सादरीकरण :

जलशांचे वरील दोन्ही प्रकार म्हणजे महाराष्ट्रातील लोकप्रिय 'तमाशा' या लोककला प्रकाराचे परिष्कृत रूप आहे. काळानुसार व परिस्थितीनुसार परिवर्तन करुन आंबेडकरी जलसाकारांनी मूळ तमाशातील गण/नमन वगळून त्याऐवजी डॉ. आंबेडकरांना वंदन करुन सादरीकरणाची सुरूवात करावी.

सत्यशोधकी जलसाकारांनी तमाशातील 'गवळणीला' फाटा देऊन थट्टा—मस्करी टाळली. तेच येथेही अपेक्षित आहे. गवळणी ऐवजी जलशात 'सोंगाडया' या पारंपरिक विदुषकी पात्राच्या साहाय्याने सूत्रधार आपल्या साथीदारांसोबत गीत, नृत्य, नाट्य, सामाजिक प्रबोधनपर जलसे एकापरीने लोकतत्त्वांचा समाजप्रबोधनात्मक आविष्कारच होतो, असे म्हणायला हरकत नाही.

<u>'जलसा' या कलाप्रकाराच्या सादरीकरण वेळेची विभागणी :</u>

**सत्यशोधकी जलसा** — सादरीकरणासाठी वेळ १५ मिनिटे

| | |
|---|---|
| १) पूर्वतयारीसाठी | ५ मिनिटे (स्वतंत्र) |
| २) वंदनगीत | ३ मिनिटे |
| ३) म. फुलेंच्या विचारांवर आधारित गीत, कविता, अखंड | ३ मिनिटे |
| ४) सवाल—जवाब, फार्स किंवा प्रहसन | ९ मिनिटे |

<u>आंबेडकरी जलसा :</u>

आंबेडकरी जलसा सादरीकरणासाठी वेळ १५ मिनिटे

| | |
|---|---|
| १) पूर्वतयारीसाठी | ५ मिनिटे (स्वतंत्र) |
| २) भीमवंदना | ३ मिनिटे |
| ३) डॉ. आंबेडकरांच्या कार्य व विचारावर आधारित गीतकाव्य | ३ मिनिटे |
| ४) सवाल — जवाब, प्रहसन किंवा फार्स | ९ मिनिटे |

<u>जलसा हा कलाप्रकार सादरीकरणासाठी नियम व अटी:</u>

१) जलसा हा कलाप्रकार सादर करण्यासाठी ६ कलावंताचा संघ असेल.

२) संघ मुलांचा किंवा मुलींचा अथवा मुला—मुलींचा मिळून असू शकेल. संघाबरोबर वादक साथीदारांची संख्या जास्तीत जास्त ३ असेल.

३) जलसा सादरीकरणासाठी १५ मिनिटांचा कमाल कालावधी असेल. पूर्वतयारीसाठी स्वतंत्र ५ मिनिटांचा कालावधी असेल.

४) 'जलसा' या कलाप्रकारासाठी इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वापर करता येणार नाही.

५) 'जलसा' या कलाप्रकाराच्या सादरीकरणातून निखळ मनोरंजन, प्रबोधन आणि लोकशिक्षण अपेक्षित आहे.

६) ‘जलसा’ या कलाप्रकाराच्या सादरीकरणात कोणत्याही धर्माच्या देवदेवता, राष्ट्रीय पुरुष यांचा अवमान होणार नाही व सामाजिक ऐक्य व एकात्मता यांना बाधा येणार नाही, कोणत्याही समाज घटकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची दक्षता संहिता सादरीकरणात घेणे बंधनकारक आहे.

७) सादरीकरणात अश्लीलता व उत्थानपणा असू नये.

## ६. कलात्मक जुळवणी (Installation) : नियमावली

१) प्रत्येक महाविद्यालयाचे चार विद्यार्थी असलेला एकच संघ सहभागास पात्र असेल. हा सांघिक कलाप्रकार आहे.

२) वेळ २ तास ३० मिनिटे असेल.

३) रंग साहित्य व इतर आवश्यक साहित्य (नवीन वस्तू) अल्प प्रमाणात वापराव्यात.

४) स्पर्धकांनी स्वतःच्या नियोजित साधनांचा, वस्तूंचा किंवा विविध घटकांचा युवक महोत्सवाच्या ठिकाणी उपलब्ध करून दिलेल्या जागेत सुयोग्य पध्दतीने वापर करून आपली कला सादर करावी.

५) स्पर्धकांनी युवक महोत्सवाच्या ठिकाणी स्पर्धेसाठी उपलब्ध करून दिलेल्या विशिष्ट जागेतच आपली कला सादर करणे बंधनकारक आहे.

६) स्पर्धेचा विषय स्पर्धकांना स्पर्धास्थळी देण्यात येईल.

७) दिलेला विषय कलात्मक जुळवणीतून (Installation) प्रभावीपणे व्यक्त व्हावा.

८) प्रस्तुत कलाप्रकारासाठी लागणारे साहित्य/सामग्री किंवा आवश्यक वस्तू स्वतः स्पर्धकाने उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे.

९) स्पर्धकांनी जास्तीत जास्त टाकाऊ वस्तूंचा/साधनांचा/पदार्थांचा वापर करणे अपेक्षित आहे.

१०) युवक महोत्सवाच्या परिसरातील टाकाऊ वस्तूंचा वापर कलात्मक जुळवणीसाठी (Installation) करता येईल.

# वैयक्तिक स्पर्धा

## १. सुगम गायन

१. एका महाविद्यालयातून एका विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थिनीस भाग घेता येईल.

२. स्पर्धकास नियोजित वेळेत सादरीकरण करावे लागेल. ज्यामध्ये प्राथमिक तयारीचा वगैरे समावेश राहणार नाही.

३. स्पर्धकांनी त्यांना लागणारे साहित्य बरोबर आणावे. स्पर्धेकरिता फक्त एक पेटी व कोणतेही एक तालवाद्य उदा. तबला, बोंगो, ढोलकी इ. आणता येईल.

४. सुगम संगीतामध्ये फक्त भावगीत, भक्तिगीत, नाट्यगीत, गझल इ. चा समावेश असेल.

## २. शास्त्रीय गायन

१. उत्तर हिंदुस्थानी संगीत (ख्याल गायन आवश्यक) व कर्नाटक संगीत ह्यापैकी कोणतेही एक असावे.

२. प्रत्येक महाविद्यालयातून एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.

३. स्पर्धकास नियोजित वेळेत सादरीकरण करावे लागेल. ज्यामध्ये प्राथमिक तयारीचा वगैरे वेळेचा समावेश राहणार नाही.

४. स्पर्धकाने लागणारे साहित्य सोबत आणावे. वाद्यसंगीतामध्ये फक्त पेटी, तबला व तंबोरा आणता येईल.

(**टीप** : सुगम गायन व शास्त्रीय गायनासाठी तंबोरा — स्वर मंडळे हे साथीदारांच्या वाद्यात धरण्यात येणार नाहीत.)

## ३. शास्त्रीय वाद्यसंगीत (शास्त्रीय तालवाद्य व शास्त्रीय सूरवाद्य)

१. प्रत्येक महाविद्यालयातून एका स्पर्धकास भाग घेता येईल.

२. स्पर्धकांनी आपली वाद्ये आणावीत. वीजेवर चालणारी वाद्ये स्पर्धेसाठी निवडता येणार नाहीत.

३. स्पर्धकास नियोजित वेळेत सादरीकरण करावे लागेल. ज्यामध्ये प्राथमिक तयारीचा वगैरे वेळेचा समावेश राहणार नाही.

४. मृदंग, पखवाज, तबला या वाद्यांचा समावेश शास्त्रीय तालवाद्य स्पर्धेमध्ये करण्यात आला आहे.

५. शास्त्रीय सूरवाद्य यामध्ये सितार, सारंगी, व्हायोलीन, हार्मोनियम, बासरी, रुद्रवीणा इत्यादींचा समावेश राहील.

## ४. शास्त्रीय नृत्य

**शास्त्रीय नृत्यामध्ये खालील नृत्यप्रकारांचा समावेश राहील.**

१. भरतनाट्यम

२. कथकली

३. मणिपुरी

४. कथ्थक

५. ओडिसी

६. कुचीपुडी

अटी :

१. वरीलपैकी कोणत्या नृत्यात भाग घ्यायचा हे स्पर्धकाने ठरवावे.

२. नृत्यात एका स्पर्धकास भाग घेता येईल.

३. स्पर्धकास जास्तीत जास्त १२ ते १५ मिनिटे वेळ दिला जाईल. त्यात त्याच्या प्राथमिक तयारीचा समावेश राहणार नाही.

४. शास्त्रीय नृत्याच्या परीक्षणाकरिता गुणविभागणी तक्ता परिशिष्ट '१०' प्रमाणे राहील. प्रत्येक स्पर्धेच्या परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

५. शास्त्रीय नृत्य सादर करताना कोणत्याही प्रकारचे ध्वनिमुद्रित (टेपरेकॉर्डर, रेकॉर्डप्लेअर) साहित्य पार्श्वसंगीत म्हणून वापरता येणार नाही.

## ५. ललित कला (Fine Art)

ललित कलेमधील स्पर्धेचे प्रकार

१. ऑन दि स्पॉट पेंटिंग (On the Spot Painting)

२. कोलाज (Collage)

३. पोस्टर मेकिंग (Poster Making)

४. मृद्मूर्तिकला (Clay Modeling)

५. व्यंगचित्रकला (Cartooning)

६. रांगोळी (Rangoli)

७. स्थळ छायाचित्रण (Spot Photography)

८. मेहेंदी (Mehandi )

### उपरोक्त स्पर्धेतील १ ते ६ या प्रकारासंबंधी सर्वसाधारण नियम

१. प्रत्येक महाविद्यालयाने 'फाईन आर्ट' स्पर्धेच्या प्रत्येक प्रकारात भाग घेऊ शकतील असे जास्तीत जास्त सहा विद्यार्थी पाठवावेत.
२. प्रत्येक स्पर्धेसाठी आयत्यावेळी विषय दिले जातील.
३. सर्व स्पर्धा प्रकारासाठी वेळ २ $^{१}/_{२}$ तासांचा असेल.
४. स्पर्धेसाठी लागणारे साहित्य स्पर्धकाने स्वतः आणवयाचे आहे.
५. स्पर्धेसाठी रंग वॉटर कलर, पोस्टर कलर किंवा ऑईल पेस्टल वापरावेत. तसेच 'कोलाज' या विषयासाठी लागणारे साहित्य उदा. कात्री, फेविकॉल आणि जुनी रंगीत मासिके स्वतः स्पर्धकांनीच आणावीत.
६. युवक महोत्सव आयोजन समितीतर्फे फक्त कागद व 'क्लेमॉडेलिंग' या स्पर्धाप्रकारासाठी माती (Clay) दिली जाईल.
७. प्रत्येक स्पर्धकाने चित्र रंगवताना खाली धरण्यासाठी १५ X २२ या आकाराचा हार्डबोर्ड आणावा.
८. 'क्लेमॉडेलिंग' या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी 'लागणारी साधने' स्वतः आणवीत.
९. मेहेंदी स्पर्धेसाठी लागणारे साहित्य स्पर्धकाने स्वतः आणवयाचे आहे.

## स्थळ छायाचित्रण **(Spot Photography)** या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांसाठी सूचना

१. एका महाविद्यालयातून एकच स्पर्धक पाठविता येईल.
२. स्पर्धकाने स्वत:चा १२ मेगा फिक्सेलचा डिजीटल कॅमेरा सोबत आणावा.
३. डिजीटल कॅमेऱ्यास मेमरी कार्ड असावे व ते स्पर्धेपूर्वी परीक्षक निरंक **(Format)** करतील.
४. स्पर्धेचा कालावधी हा अडीच तासांचा असेल.
५. स्पर्धकाला जास्तीत जास्त पाच (५) छायाचित्रे परीक्षकांनी स्पर्धेच्या वेळी घोषित केलेल्या विषयावर काढता येतील.
६. छायाचित्रांचे मिक्सिंग, मॅचिंग, मॅरफिंग करता येणार नाही.
७. संयोजकांना आवश्यकता वाटेल तेव्हा ही छायाचित्रे वापरण्याचे सर्व हक्क राहतील.
८. अतिरिक्त सूचनांची घोषणा स्पर्धेच्या वेळी केल्या जाईल.
९. एखाद्या स्पर्धा प्रकारासाठी कमीतकमी पाच स्पर्धकांचा सहभाग असायला हवा. नसेल तर ती स्पर्धा घ्यावी किंवा नाही, हे आयोजक, संचालक, विद्यार्थी विकास विभाग तसेच विद्यार्थी विकास विभागाचे सल्लागार  हे ठरवतील.
१०. परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम असेल.

## फाईन आर्ट स्पर्धा आयोजकांसाठी सूचना

१. स्पर्धेसाठी लागणारा कागद स्पर्धा आयोजकातर्फे पुरविण्यात येईल. कागदाचा आकार — १/४ कागदाचा प्रकार — माऊंट बोर्ड.
२. क्लेमॉडेलिंगसाठी प्रत्येक स्पर्धकाला भिजवलेली माती कमीत कमी एक किलो दिली जाईल.
३. चित्र काढण्यासाठी डेस्क असलेला वर्ग असावा.
(आयोजक महाविद्यालयासाठी सूचना)

## महाराष्ट्राच्या लोककला

१. भाषा व विषय : महाराष्ट्राच्या लोककला यामधील सर्व स्पर्धा फक्त मराठी भाषेतच सादर करता येतील.
(प्रादेशिक भाषा/बोलीभाषा )
२. यातील विषय हा सामाजिक /प्रादेशिक/पारंपरिक/शैक्षणिक असावा.
(राष्ट्रीय एकात्मता, साक्षरता, पर्यावरण, प्रदूषण, एड्स, दारूबंदी, कुटुंब नियोजन, राष्ट्रीय पुरुष, स्त्री हुंडाबळी, जातीयवाद, बाल कल्याण, बाल विवाह, लोकसंख्या वाढ इत्यादी. तसाच तो बीभत्स/अश्लील नसावा.)

## लोककला सादरीकरणासाठीची वाद्ये

महाराष्ट्र लोककलेच्या सर्व स्पर्धांच्या सादरीकरणाकरिता पाश्चात्त्य वाद्यांचा उपयोग करता येणार नाही. त्याकरिता खालील पारंपरिक वाद्ये वापरता येतील. डफ, ढोलक, खंजेरी, तुणतुणे, ढोलकी, तबला, हार्मोनियम, टिंगरी, टाळ, घुंगरू, बासरी, पायपेटी, सारंगी, वीणा, मृदंग, पखवाज, संबळ इत्यादी.

## उपरोधिक/विडंबन नाट्य अभिनय (Skit)

१. संघात सहापेक्षा अधिक विद्यार्थी असू नयेत. तीन साथीदार असावेत.
२. वैयक्तिक निंदानालस्ती असू नये.
३. मध्यवर्ती कल्पना, अभिनय, वेशभूषा आणि एकूण परिणाम या आधारे मूल्यमापन केले जाईल.

## मूक अभिनय (Mime)

१. संघात सहापेक्षा अधिक विद्यार्थी असू नयेत. दोन साथीदार असावेत.
२. मध्यवर्ती कल्पना, अभिनय, वेशभूषा आणि एकूण परिणाम या आधारे मूल्यमापन केले जाईल..

## नक्कल (Mimicry )

१. वैयक्तिक निंदानालस्ती असू नये.

## एकांकिका

१. एकांकिकाचे परिनिरीक्षण करून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नाट्यसंहितेमध्ये कुठलाही आक्षेपार्ह मजकूर नसल्याचे प्रमाणपत्र द्यावे.
२. आंतरविद्यापीठ महोत्सवासाठी संघ निवडताना हिन्दी एकांकिकेतील अभिनयात प्रथम/द्वितीय/तृतीय पारितोषिक प्राप्त कलावंतांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. परीक्षकांचा व निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
३. आंतरविद्यापीठ युवक महोत्सवासाठी संघ निवडताना युवक महोत्सवातील सादरीकरण, विजेतेपद व निवड समितीच्या शिफारशीनुसार सांघिक स्पर्धेसाठी संघ तयार केला जाईल.

## वाङ्मय स्पर्धा

## वादविवाद स्पर्धा

१. प्रत्येक महाविद्यालयाला एकच संघ पाठविता येईल.
२. संघ विद्यार्थी—विद्यार्थिनी किंवा विद्यार्थी—विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी—विद्यार्थिनी असा असेल.
३. वादविवाद स्पर्धेसाठी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स, नवी दिल्लीचे सर्व नियम लागू राहतील.
४. वादविवाद स्पर्धेचा विषय महाविद्यालयांना कळविला जाईल.

## वक्तृत्व स्पर्धा

१. एका महाविद्यालयातून एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२. वक्तृत्व स्पर्धेचा विषय महाविद्यालयांना कळविला जाईल.

## कथाकथन स्पर्धा

१. एका महाविद्यालयातून एकाच स्पर्धकास भाग घेता येईल.
२. स्पर्धकाला स्पर्धेमध्ये स्वलिखित एकच कथा सादर करता येईल.
३. सादरीकरणा पूर्वी स्पर्धकांने कथासंहिता संयोजकाकडे जमा करणे अनिवार्य आहे.

## लोकसंगीत (Folk Orchestra)

१. प्रत्येक महाविद्यालयास एक संघ पाठवता येईल.
२. एका संघात ९ स्पर्धकांचा समावेश असेल.
३. संघ केवळ मुले—मुली किंवा मुला—मुलींचा असू शकेल.
४. संघाला ५ मिनिटांचा वेळ तयारीसाठी दिला जाईल.
५. मंचावर संघासोबत साथसंगत देणारे तीन विद्यार्थी साथीदार वेगळ्या पोषाखात असणे आवश्यक आहे. जेणेकरून ते संघापेक्षा वेगळे असल्याचे निदर्शनास येईल.
६. व्यावसायिक साथीदार/साथसंगत देणारे संघापासून वेगळे बसलेले असावेत. त्यांनी संघाला प्रोत्साहित न करण्याची काळजी घ्यावी.
७. प्रत्येक संघाने अशा लोकधुनीचा वापर करावा की जी धून लोकप्रिय असेल व आपल्या राज्याची, विद्यापीठाची, परिसराची ओळख प्रदर्शित करेल.
८. फोक ऑर्केस्ट्रासाठी लोकसंगीतामधील व लोकजीवनामधील वापरली जाणारी वाद्येच वापरली जावीत. जसे—डफ, ढोलकी, खंजिरी, तुणतुणे, तबला, हार्मोनियम, टिंगरी, टाळ, तुतारी व लोकसमूहामध्ये वापरली जाणारी इतर पारंपरिक वाद्ये वापरता येतील. इलेक्ट्रॉनिक वाद्ये वापरता येणार नाहीत.

## सर्व स्पर्धांकरिता सर्वसाधारण नियम

१. कोणत्याही स्पर्धेसाठी किमान तीन संघांचे प्रवेश अर्ज येणे आणि प्रत्यक्ष तीन संघ हजर राहणे आवश्यक आहे. त्यापेक्षा कमी प्रवेशिका आल्यास ती स्पर्धा घेतली जाणार नाही. तथापि तीनपेक्षा कमी संघ महोत्सवाकरिता आल्यास त्यांना आपल्या कार्यक्रमाचे फक्त सादरीकरण करता येईल, पण पुरस्कार दिले जाणार नाहीत.

   (**टीप**: वरील नियम शास्त्रीय गायन व शास्त्रीय नृत्य या दोन्ही सर्धेसाठी लागू राहणार नाहीत. या दोन्ही स्र्धेसाठी प्रत्येकी तीन संघ प्रत्यक्ष नाही आले तरी स्पर्धा घेण्यात येईल अशा वेळी या स्पर्धेसाठी प्रथम आणि द्वितीय पारितोषिके देण्यात येतील.)

२. युवक महोत्सवातील प्रत्येक स्पर्धेसाठी वेगळ्या प्रवेशिका सोबत दिलेल्या नमुन्यात संयोजन समितीने निर्धारित केलेल्या मुदतीमध्ये संचालक, विद्यार्थी विकास विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे पाठवाव्यात. तसेच प्रवेशिकेची एक प्रत संबंधित संयोजक प्राचार्यांकडे माहितीस्तव पाठवावी. निर्धारित वेळेनंतर आलेल्या प्रवेशिकांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
३. युवक महोत्सवातील संगीत आणि नृत्य या स्पर्धांमधून विद्युत उपकरणे वापरता येणार नाहीत.
४. 'सॅक्साफोन' या वाद्याचाही वापर करता येणार नाही.
५. पाश्चात्त्य गायन (सुगम/समूह) यासाठी विद्युत/इलेक्ट्रॉनिक वाद्ये वापरता येतील.
६. महाराष्ट्राच्या लोककला (कव्वाली) या स्पर्धा वगळून बाकी सर्व स्पर्धांसाठी असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स, नवी दिल्ली यांचे सर्व नियम लागू राहतील.
७. वाङ्मयीन स्पर्धांसाठी भाषा विविध असल्या तरी बक्षिसे भाषानिहाय असणार नाहीत.

## ८. प्रवेश शुल्क

युवक महोत्सवामध्ये भाग घेण्याकरिता विद्यापीठाने खालीलप्रमाणे शुल्क ठरविले आहेत.

१. प्रत्येकी सांघिक स्पर्धेकरिता रू. ५०/—
२. प्रत्येकी वैयक्तिक स्पर्धेकरिता रू. ३०/—
३. महाविद्यालयास जितक्या स्पर्धांमध्ये संघ पाठवावयाचे आहेत, त्यानुसार प्रवेश शुल्काची रक्कम, ऑनलाईन पध्दतीने भरणे अनिवार्य आहे.
४. प्रवेश शुल्क व विद्यार्थी कल्याण निधी भरल्याशिवाय कोणत्याही महाविद्यालयाच्या संघास स्पर्धेमध्ये भाग घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही. विद्यार्थी विकास निधी भरलेल्या पावतीची सत्यप्रत प्रवेश फॉर्मला जोडावी.

## ९. स्पर्धकाची पात्रता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालयांच्या तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व एकवर्षीय अभ्यासक्रमास प्रवेशित असणाऱ्या पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना युवक महोत्सव स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. **स्पर्धकाचे वय युवक महोत्सव आयोजनाच्या शैक्षणिक वर्षातील १ जुलै रोजी २५ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.**

**कोणत्याही विद्यार्थ्यास चारपेक्षा अधिक (वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसह) स्पर्धांमध्ये भाग घेता येणार नाही.**

## १०. प्रवास, निवास व भोजन भत्ते

महोत्सवातील सर्व स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धेकांचा प्रवास व भोजन इत्यादी खर्च संबंधित महाविद्यालय करेल.

## ११. महाविद्यालयीन संघाचे व्यवस्थापक

प्रत्येक महाविद्यालयाच्या स्पर्धक संघाबरोबर एका ज्येष्ठ प्राध्यापकास व्यवस्थापक म्हणून पाठवावे लागेल. याशिवाय संघामध्ये विद्यार्थिनींचा समावेश असल्यास महिला व्यवस्थापिका पाठविणे अनिवार्य आहे.

संघाबरोबर येणाऱ्या व्यवस्थापकाने आपला संघ व संयोजन समिती यांच्यातील संपर्क अधिकारी म्हणून काम करावे, अशी अपेक्षा आहे. संघव्यवस्थापकाने आपल्या संघासोबत राहणे आवश्यक आहे. संघातील विद्यार्थ्यांची शिस्त, त्यांच्या निवासस्थानाची स्वच्छता व संघातील विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य याची सर्व जबाबदारी संबंधित संघव्यवस्थापकांवर राहील. सादरीकरणाच्या वेळेचे बंधन संघव्यवस्थापकाने काटेकोरपणे पाळावे. तक्रारीची नोंद संघव्यवस्थापकांनीच स्थानिक संयोजन समितीच्या अध्यक्ष/संचालक, विद्यार्थी विकास विभाग, यांच्याकडेच लेखी स्वरूपात करावी.

## १२. ओळखपत्र

युवक महोत्सवामध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकासोबत प्राचार्यांच्या सहीनिशी चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र तसेच आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवासाठी **खास तयार केलेले ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.** (ओळखपत्र संयोजकांनी व संबंधित अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास दाखविणे आवश्यक आहे). ओळखपत्राशिवाय कोणत्याच स्पर्धेत अथवा कार्यक्रमात भाग घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. संघव्यवस्थापक, संघव्यवस्थापिका, प्रशिक्षक, वादक, वादक साथीदार यांच्याकडेही प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे युवक महोत्सवासाठी खास तयार केलेले ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय युवक महोत्सवात सहभागी होता येणार नाही.

## १३. कार्यक्रम

दैनंदिन कार्यक्रम व कार्यक्रमांच्या स्थळासंबंधीची सविस्तर माहिती व वेळापत्रकासंबंधी संयोजक प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालयांना कळवतील. तसेच कार्यक्रमाची एक प्रत संचालक, विद्यार्थी विकास विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे पाठवतील.

१४. निश्चित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व संघांचे कार्यक्रम होतील. त्यात कोणत्याही स्वरूपाचा बदल मान्य केला जाणार नाही. काही अपरिहार्य कारणामुळे नियोजित कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार संयोजन समितीस राहील.

१५. विविध स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघासाठी दिलेला वेळ निरीक्षण करण्याच्या दृष्टीने स्वतंत्र वेळरक्षकाची (टाईम किपर) नियुक्ती संयोजकांमार्फत करण्यात येईल.

१६. प्रत्येक महाविद्यालयाने विविध स्पर्धेसाठी दिलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ घेतल्यास अशा संघास स्पर्धेतून बाद करण्यात येईल

### आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवातील पारितोषिके

१. आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात पारितोषिके मिळालेल्या विद्यार्थ्यांखेरीज सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र विद्यापीठातर्फे देण्यात येतील.

२. वैयक्तिक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके प्रमाणपत्रासह दिली जातील.

३. सांघिक स्पर्धेत संबंधित महाविद्यालयास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके प्रमाणपत्रासह दिली जातील.

४. एकांकिका स्पर्धेमध्ये वैयक्तिक अभिनयासाठी स्त्री व पुरूष कलाकरांना प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके प्रमाणपत्रासह दिली जातील.

५. एकांकिका स्पर्धेमध्ये दिग्दर्शनासाठी (वैयक्तिक) प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके प्रमाणपत्रासह दिली जातील.

६. पारितोषिके विद्यापीठातर्फे दिली जातील.

### अनुदान

आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या आयोजनासाठी संयोजक माहविद्यालयास युवक महोत्सव आयोजित करण्याकरिता अनुदान म्हणून देण्यात येणारा निधी मा. कुलगुरूंच्या आदेशावरून विद्यार्थी विकास विभाग निश्चित करेल. सदरील निधीतून झालेल्या खर्चासंबंधीचे ‘उपयोगिता प्रमाणपत्र’ स्पर्धा संपताच पाठविण्याची जबाबदारी संयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर राहील.

## आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाची आचारसंहिता

१. सदरील युवक महोत्सवात एका विद्यार्थ्यास कोणत्याही चार स्पर्धेत भाग घेता येईल.

२. विद्यार्थ्याजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.

३. युवक महोत्सवात सहभाग घेणाऱ्या महाविद्यालयाचा संघ, संघव्यवस्थापक, संघव्यवस्थापिका, वादक, वादक साथीदार, प्रशिक्षकांसह सर्वांची संख्या जास्तीत जास्त ४५ असावी.

४. युवक महोत्सव ठरलेल्या तारखेच्या १५ दिवस आगोदर प्रवेश फॉर्म, प्रवेश शुल्क व विद्यार्थी कल्याण निधी भरून विद्यार्थी विकास विभागात जमा करावे. तसेच एक प्रत संयोजक महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे पाठवावी.

५. दिलेल्या मुदतीनंतर किंवा ऐनवेळी कोणत्याही स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही.

६. स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी, सूचना व प्रश्न आपल्या संघव्यवस्थापकांमार्फत संयोजकांना/संचालक, विद्यार्थी विकास यांना कळवाव्यात.

७. महाविद्यालयाच्या संघात जर मुली असतील तर संघव्यवस्थापिका असणे आवश्यक आहे.

**८. २५ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या स्पर्धक विद्यार्थ्याने स्पर्धेत सहभाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित स्पर्धक, संघव्यवस्थापक आणि प्राचार्य यांच्यावर असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स, नवी दिल्ली यांच्या नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.**

**९. युवक महोत्सवातील स्पर्धांच्या निकालाबाबत परीक्षकांचे निर्णय अंतिम राहतील. या संदर्भात तक्रार असेल तर लेखी स्वरूपात संघव्यवस्थाकांमार्फत रीतसर तक्रार संचालक, विद्यार्थी विकास विभाग, यांच्याकडे द्यावी. याबाबत कुठलाही रोष प्रकट करणे नियमबाह्य वर्तन ठरविले जाईल. याचे उल्लंघन करणाऱ्या संघास पुढील दोन वर्षांसाठी सहभाग घेता येणार नाही.**

१०. युवक महोत्सवाच्या प्रारंभापासून ते समारोपापर्यंत संघव्यवस्थापकांनी संघातील सर्व स्पर्धक शिस्तीत व बंधुभावाने वागतील याची काळजी घ्यावी. जर संघातील वैयक्तिक किंवा सामूहिक स्पर्धकांनी गैरवर्तणूक केलेली आढळल्यास असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आणि मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स, नवी दिल्ली यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

११. ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थी विकास निधी (शैक्षणिक वर्षातील किंवा मागील बाकी) भरलेला नसेल, त्या महाविद्यालयांच्या संघास युवक महोत्सवात प्रवेश मिळणार नाही, असा निर्णय सल्लागार समितीच्या बैठकीत झाला आहे. प्रवेशिकेसोबत विद्यार्थी विकास निधी भरलेली विद्यापीठाची पावती (छायांकित प्रत) जोडणे आवश्यक आहे, कृपया याची नोंद घ्यावी.

१२. युवक महोत्सव आनंदी, उत्साहाच्या आणि शांततेच्या वातावरणात संपन्न व्हावा याकरिता प्राचार्य, संघव्यवस्थापक व स्पर्धक ह्या सर्वांच्या सहाकार्याची नितांत गरज आहे.

१३. परीक्षणाबाबत काही तक्रार असेल तर ती लेखी स्वरूपात संघव्यवस्थापकांनी आपल्या स्वाक्षरीनिशी संयोजन समितीच्या अध्यक्षांकडे द्यावी. कार्यक्रमस्थळी गैरवर्तन करु नये किंवा प्रसिध्दी माध्यमांकडे आपल्या भावना व्यक्त करु नयेत. असे कृत्य

जर घडले किंवा कुठल्याही संघाकडून युवक महोत्सवाच्या काळात गैरवर्तणूक झाल्यास संबंधित महाविद्यालयावर ए.आय.यु. नवी दिल्ली, यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**१४. आपल्या महाविद्यालयाच्या संघात सहभागी होणारे संघव्यवस्थापक, विद्यार्थी विद्यार्थिनींची व वादक, साथीदार, प्रशिक्षक यांची एक यादी पूर्वनियोजन करण्याच्या दृष्टीने आयोजक महाविद्यालयास पाठवावी व त्याची एक प्रत संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांचेकडे पाठवून द्यावी.**

१५. युवक महोत्सवातील कुठल्याही कला प्रकारासाठी धारदार शस्त्रांचा, काचेचा, अग्नीचा किंवा ज्वालाग्राही पदार्थांचा उपयोग करता येणार नाही. उपरोक्त वस्तूंचा वापर केल्यास संबंधित संघास त्या कला प्रकाराचे गुण मिळणार नाहीत. त्याचबरोबर त्या महाविद्यालयाचा इतर कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१६. एकांकिका हिंदी भाषेत असेल तर प्रपत्रकामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा.

१७. एकांकिका लेखकाचे सादरीकरण करण्याच्या परवानगीचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

१८. युवक महोत्सवामध्ये सहभागी संघव्यवस्थापकांनी आपापल्या संघासासोबत मुक्कामी राहणे अनिवार्य आहे. संघव्यवस्थापकांची वेगळी व्यवस्था केली जाणार नाही. तसेच सहभागी स्पर्धकांनी रात्री झोपण्याकरिता सतरंजी व ब्लॅकेट सोबत आणावे.

१९. प्रस्तुत युवक महोत्सवात सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी युवक महोत्सवाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. प्रत्येक कलाप्रकाराच्या किंवा स्पर्धेच्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे त्या त्या महाविद्यालयाचा संघ मंचावर उपस्थित न राहिल्यास संबंधित संघास स्पर्धेतून बाद करून पुढील संघास सादरीकरणासाठी पाचारण केले जाईल. स्पर्धेतून संघ बाद झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संघव्यवस्थापक किंवा संघव्यवस्थापिका यांची राहील. कोणत्याही सबबीवर बाद झालेल्या संघास पुन्हा सादरीकरणाची संधी दिली जाणार नाही.

२०. पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही कार्यक्रमाच्या मंचावर येता येणार नाही व कोणत्याही प्रकारचे मनोगत व्यक्त करता येणार नाही, असे घडल्यास ए. आय. यु. नवी दिल्ली यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**२१. स्पर्धेपूर्वी किमान अर्धातास अगोदर संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांनी आपल्या संघाचा रिपोर्टिंग फॉर्म भरुन संबंधित मंचाकडे सादर करणे बंधनकारक आहे.**

२२. आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात सहभाग घेण्यासाठी स्पर्धक किमान पूर्णवेळ एक वर्षीय अभ्यासक्रमासाठी (**Degree/Course/Diploma**) प्रवेशित असणे आवश्यक आहे.

प्रवेशिकेचा नमुना

युवक महोत्सव निवड प्रक्रिया

महाविद्यालयाचे नाव :

स्पर्धेचे नाव :

| अ.क्र. | भाग घेणाऱ्या स्पर्धकाचे नाव | वर्ग | जन्मतारीख | वय — संबंधित शै. वर्षातील १ जुलै रोजी | कायमचा पत्ता व दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वर दर्शविलेले स्पर्धक आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत.

१. स्पर्धकाचे वय १ जुलै तारखेस २५ वर्षापेक्षा कमी आहे.

२. स्पर्धक व्यावसायिक, संगीत शाळा किंवा संस्था येथील विद्यार्थी नाहीत.

३. स्पर्धेतील अटी व नियम स्पर्धकांना बंधनकारक आहेत.

४. कोणत्याही स्पर्धकाने चारपेक्षा अधिक स्पर्धेत भाग घेतलेला नाही.

५. स्पर्धकांनी युवक महोत्सवाच्या काळात गैरवर्तणूक केल्यास असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली आणि मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स, नवी दिल्ली यांच्या नियमांनुसार कारवाई केल्यास हरकत नाही.